CMYK

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्येच आता कॅन्सर रुग्णांसाठी किमोथेरपी सुविधा >>पान 2

पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी ताकद पणाला लावून महायुतीचे आमदार मोठ्या संख्येने विजयी करावेत >>पान 3

मेहकर विधानसभा मतदारसंघात 'तगडा' उमेदवार >>पान 4

**सुविचार**

निघून गेलेला क्षण
कधीच परत आणता येत नाही.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीलाही तृप्ती डिमरीची भुरळ? आतील पान



■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 47 ■ सोमवार, दि. 23 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# जालना, पुणेनंतर आता अहमदनगर बंदची हाक

## मनोज जरागेंच्या समर्थनार्थ सकल मराठा रस्त्यावर

दैनिक आपला विदर्भ

**अहमदनगर/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केलं असून आज उपोषणाचा ६ वा दिवस आहे. एकीकडे मराठा समाज मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ महाराष्ट्रात एकत्र आला असून अंतरवाली सराटीत देखील समाजाने गर्दी केली आहे. दुसरीकडे मनोज जरांगे यांच्या उपोषणाला आव्हान देत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही उपोषण सुरू केलं असून त्यांच्या उपोषणाचा आज ४ था दिवस आहे. वडगोद्री येथे हाकेंनी उपोषण सुरू केल्यामुळे जालना जिल्ह्यात ओबीसी आणि मराठा समाजात तणावाचे वातावरण निर्माण झालं आहे. त्यातच, मराठा समाजाने जालना जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. त्यानंतर, परभणी आणि पुणे जिल्ह्यातही मराठा समाजाने बंदची हाक दिली आहे. आता, सकल मराठा समाजाकडून अहमदनगर जिल्हा बंदची देखील हाक देण्यात आली आहे.



सकल मराठा समाजाच्यावतीने उद्या अहमदनगर जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला सुरुवात केलीय. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून उद्या अहमदनगर जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अहमदनगर तहसील कार्यालयासमोर गेल्या दोन दिवसापासून आमरण उपोषण देखील सुरू आहे. सगे-सोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करा, हैदराबाद गॅझेट लागू करा, सातारा गॅझेट लागू करा, बॉम्बे गव्हर्मेंट गॅझेट लागू करा, मराठा बांधवांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्या, अशा विविध मागण्यांसाठी हे उपोषण सुरू असून, त्याच पार्श्र्वभूमीवर उद्या विविध जिल्ह्यात बंदची हाक देण्यात आली असून अहमदनगर जिल्हा बंदची देखील हाक देण्यात आली आहे.

### मनोज जरांगेंची तब्येत खालावली

मनोज जरांगे पाटील यांनी २० जुलैपासून पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केलं आहे. सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी आणि मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी करत त्यांनी आपलं उपोषण सुरू केलं असून आज उपोषणाचा ६ वा दिवस आहे. सोमवारी जरांगे यांनी पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकारवर निशाणा साधला होता. तसेच, देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्र दौरा केला, पण मराठा आरक्षणावर ते काहीही बोलले नाहीत, त्यावरुन त्यांनी शाह यांच्यावर टीका केली होती. तर, मंत्री छगन भुजबळ यांनाही इशारा देत, पुढचं उपोषण हे येवल्यात येऊन सुरू करेल, असे जरांगे यांनी म्हटले होते. आता, उपोषणाच्या चौथ्या दिवशी त्यांची तब्येत खालावली असून जालन्यातील शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय पथक त्यांच्या सेवेसाठी घटनास्थळी दाखल आहे. त्यानुसार, मनोज जरांगे यांचा बीपी व शुगर कमी झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

# विधानसभेसाठी रामदास आठवलेंनी फुंकलं रणशिंग

## भाजपकडे केली इतक्या जागांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जागावाटप आणि उम ेदवारी यांची चर्चा सुरू आहे, अशातच आता केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी जागांची मागणी केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीबाबत आठवलेंनी मोठं वक्तव्य केलं आहे. विधानसभा निवडणुकीत आमच्या पक्षाला किम ान १० ते १२ जागा द्याव्या, माझ्या पक्षासोबत मोठ्या प्रमाणात दलित म तदार आहेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.



रामदास आठवलेंनी किती जागांची केली मागणी?

वंचित बहुजन आघाडीला राज्यात म्हणावे तितके यश मिळालेले नाही. आम्ही लोकसभेला २ जागा मागितल्या होत्या, मात्र मिळाल्या नाहीत. आता विधानसभा निवडणुकीत आम्हाला १२ जागा द्याव्यात. विदर्भात किमान ४ जागा द्याव्या. महाराष्ट्रात आम्ही १८ जागांची यादी केली आहे. त्यापैकी १२ जागा द्याव्या. आम्हाला भाजपच्या कोट्यातून मानू नये, तर भाजप, शिंदे आणि अजित दादा तिघांनी आम्हाला त्यांच्या कोट्यातून ४ – ४ जागा द्याव्या, म्हणजे आम्हाला १२ जागा मि ळतील. येणाऱ्या एनडीए सरकारमध्ये आम्हाला मंत्री पद द्यावे, तसेच २ म हामंडळ दावे अशी मागणी आठवलेंनी केली आहे. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चतुर नेते आहे. ते आमची ताकत ओळखतील, असंही त्यांनी म्हटलं आहे.

महायुतीत आधीच तिन पक्षात जागांची म ारामारी असताना तुम्हाला १२ जागा आणि

>>पान ४

# एकच वादा अजित दादा! धाराशिवच्या दाजींना दिलेला शब्द अजित पवार पूर्ण करणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार हे दिलेला वादा पूर्ण करणारे म्हणुन राज्यभरात प्रसिद्ध आहेत . शब्दाचा पक्का दादांचा वादा अशी दादाची ख्याती आहे. पण गेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्याच पक्षातील धाराशिव लोकसभा मतदार संघातून इच्छुक असलेले उमेदवार सुरेश बिराजदार यांना भर सभेत अजित पवार यांनी सुरेश बिराजदार यांना आगामी काळात आमदार करतो असा शब्द दिला होता. या शब्दामुळे सुरेश बिराजदार यांनी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली होती पण अजित पवार यांनी भर सभेत दिलेल्या शब्दाचा व्हिडीओ आत्ता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



सध्या सुरेश बिराजदार हे राज्यपाल कोट्यातून विधानपरिषद आमदारकीसाठी इच्छुक आहेत त्यांनी पक्षाकडे तसा अर्ज देखील केला आहे त्यामुळे दादा आपला वादा पाळणार का हे पाहणे महत्वाचं आहे.

धाराशिव जिल्ह्यात दाजी या टोपणनावाने ओळखले जाणारे सुरेश माणिकराव बिराजदार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजितदादा गट) प्रदेश उपाध्यक्ष आहेत.सुरेश बिराजदार हे गेल्या ५ वर्षापासून धाराशीव लोकसभा मतदारसंघात तयारी करत होते. मात्र ऐनवेळी बदलत्या घडामोडीत त्यांना डावलण्यात आले. मात्र अजित पवारांनी भर सभेत आश्वासन दिल्याने कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. गेली ४० वर्षे सुरेश बिरराजदार हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ आहेत. तसेच राष्ट्रवादीच्या संकट काळात पक्षाने त्यांच्यावर दिलेली जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली जिल्हा बँक वाचवण्यासाठी त्यांनी यशस्वी प्रयत्न केले. कायम एकनिष्ठपणे राम करत असलेल्या बिराजदार यांना विधानपरिषदेवर संधी मिळावी असे कार्यकर्त्यांना वाटत आहे.


लोकसभा निवडणुकीदरम्यान, राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी साताऱ्यातील वाई येथे सभा घेतली होती. साताऱ्याच्या जागेवरून महायुतीचा उमेदवार निवडून आल्यास नितीन पाटील यांना खासदार करतो, असे आश्वासन दिले होते. त्यानंतर नितीन पाटील यांना खासदारकीची संधी कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. दरम्यान, राज्यसभेच्या निवडणुकीत अजित पवार यांनी नितीन पाटील यांना तिकीट दिले आणि आणि आपले आश्वासन पूर्ण केले. आता नितीन पाटील राज्यसभेचे खासदार होणार आहेत.

# बीडमध्ये भीषण अपघात, कंटेनरनं कारला उडवलं, चौघांचा जागीच मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीडमधून मोठी बातमी समोर आली आहे, अंबाजोगाई-लातूर रोडवर भीषण अपघात झाला आहे, या अपघातामध्ये चार जण जागीच ठार झाले आहेत. मुसळधार पावसात अंदाज न आल्याने कार- आणि कंटेनरची धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की, कारचा चुराडा झाला असून कारमधील सर्व व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, बीडच्या अंबाजोगाई -लातूर रोडवर नांदगाव पाटीजवळ आज पहाटे स्विफ्ट कार आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला.



या अपघातात स्विफ्ट कार मधील चौघेही जागीच ठार झाले आहेत. सर्व मृत व्यक्ती लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील जगलपूर येथील असून, त्यांची नावे अद्याप समजू शकलेली नाहीत.

रात्री उशीरा जगलपूर येथील चार जण स्विफ्ट कारमधून (एमएच २४ एएस ६३३४) औरंगाबादला निघाले होते. रात्री सुरू असलेल्या मुसळधार पावसात अंबाजोगाई लातूर रोडवरील पाचपीर दर्गा जवळ त्यांच्या कारची आणि समोरून येणाऱ्या कंटेनरची (एमएच १२ एमव्ही ७१८८) जोरदार धडक झाली. हा अपघात मध्यरात्री एक वाजताच्या सुमारास झाला. यावेळी कार कंटेनरच्या खाली घुसल्याने कारचा चुराडा झाला आणि आतील चौघांचा जागीच मृत्यू झाला.

सर्व मृतदेह अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहेत. अपघाताच्या वेळी मुसळधार पाऊस सुरू होता, त्यामुळे चालकांना समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज न आल्याने अपघात झाला असावा अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# दशनाम गोसावी समितीच्यावतीने विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार

## गोसावी समाजाच्या उन्नतीसाठी महामंडळ स्थापन करून २०० कोटीची तरतूद करावी : सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** दशनाम गोसावी बचाव समिती महाराष्ट्र राज्य समितीच्यावतीने विविध क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या व सेवा निवृत्त झालेल्या मान्यवरांच्या तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

दि.२२ सप्टेंबर रोजी मेहकर येथील ग्रामीण रुग्णालय जवळ हरणटेकडी येथे दशनाम गोसावी समाधी बचाव समिती च्या वतीने गोसावी समाजातील गुणवंत व पानाआड दडलेल्या प्रतिभावंतांचा जाहीर सत्कार आणि मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मंत्रालयीन सेवानिवृत्त सहसचिव तथा शिवसेना नेते सिद्धार्थ खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना सिद्धार्थ खरात म्हणाले की जो समाज एकत्र येऊन संघटित होतो तो समाज उन्नती करतो म्हणून



शासनाने या समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक उन्नतीसाठी गोसावी समाज महामंडळ स्थापन करून दोनशे कोटी रुपयांची भरीव तरतूद करावी अशी मागणी खरात यांनी यावेळी केली.या वेळी विविध क्षेत्रात ज्यांनी ज्यांनी आपला ठसा उमटवला उत्तुंग यश प्राप्त केले त्या मान्यवरांचा व गुणवंत विध्यार्थी यांचा सुध्दा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे उदघाट्क श्री.महंत योगी श्याम बाबा भारती (श्री क्षेत्र माहूर गड) कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत गिरी प्रदेशाध्यक्ष दासनाम गोसावी समाज समाधी बचाव समिती, प्रमुख उपस्थिती मध्ये शिवसेना उपप्रमुख आशिष रहाटे, लिंबाभाऊ पांडव, किशोर गारोळे, ड आकाश घोडे,रामेश्र्वर गिरी,उपविभागीय अधिकारी ब्रम्हगिरी, पोलीस निरीक्षक अमरावती नवनियुक्त ठढज गौरव गिरी, राजेंद्र गिरी, सहदेव पुरी,यांची उपस्थिती होती पुढे बोलतांना खरात म्हणाले की ज्या समाजामध्ये कल्पक तरुनाई असते त्या समाजाची प्रगती होते. या समाजाने देशाला अध्यात्म दिलं आहे. या समाजाने आधात्माच्या बळावर इथल्या समाजाचं दुःख हरण करण्याचं काम केलं. त्यामुळे सरकारने या समाजाला दफनभूमी साठी जागा अधिग्रहित करून जागा उपलब्ध करून द्यावी तसेच या राज्यात आमचे माविकास आघाडीचे सरकार नक्कीच येणार आहे. तुम्ही अत्यंत योग्य माणसाला आज येथे बोलावले आहे. मेहकर मतदारसंघात सुद्धा बदल होऊन. इथे सुद्धा शिव सेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा उमेदवार निवडून येणार आहे. मला जर उमेदवारी मिळाली तर निश्चित तुमच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी पूर्ण ताकतीनिशी तडीस नेईल. असेही आश्वासन खरात यांनी दिले, या वेळी सर्व गुणवंतांचे स्वागत केले. तर संचलन व आभार गणेश पुरी यांनी मानले या कार्यक्रमाला जिल्हाभरातून गुणवंत विद्यार्थी, पालक व प्रतिष्ठित मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.





**उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने अठरापगड जातीला सोबत घेऊन त्यांच्या विकासासाठी काम केले आहे.आता सुद्धा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या उमेदवाराला पसंती देण्याची संधी आहे. त्यामुळे गोसावी समाजाच्या उन्नतीसाठी सर्व समाज बांधवांनी ताकतीनिशी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेसोबत राहावे, पक्षानी मला उमेदवारी दिली , तुम्ही आशीर्वाद देऊन सेवा करण्याची संधी द्यावी, गोसावी समाजाच्या मागण्या निकाली काढेल असे आश्वासन यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे इच्छुक उमेदवार यांनी सिद्धार्थ खरात यांनी दिले.तर यावेळी दशमान गोसावी समितीच्या वतीने दशमान गोसावी समाज बांधव आपल्या सोबत राहील असे असा विश्वास दिला.**

CMYK

## एक देश एक निवडणूक

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशीनुसार एक देश एक निवडणूक या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली. या समितीने लोकसभा निवडणुका जाहीर होण्यापूर्वी सादर केलेला अहवाल मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आला होता. २०२९ पासून लोकसभा आणि राज्य विधानसभा तसेच स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची शिफारस विधी आयोगाकडून केली जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने एक देश एक निवडणूक शिफारशीला मान्यता दिल्यानंतर ही संकल्पना भारतासारख्या खंडप्राय आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशात शक्य आहे का? यावर चर्चा घडू लागली आहे. एक देश एक निवडणूक म्हणजे सर्व निवडणुका एकाच वेळी होणे. अगदी ग्रामपंचायती पासून लोकसभेपर्यंत सर्व निवडणुका एकाच वेळी घेणे. अर्थात हे शक्य नसल्यानेच कोविंद समितीने लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाच वेळी घ्याव्यात व त्यानंतरच्या १०० दिवसात स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात अशी तरतूद शिफारसीत केली आहे. अर्थात देश स्वातंत्र्य झाल्यावर पहिल्या चार निवडणुका म्हणजे १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ साली झालेल्या निवडणुका या एकत्रच लढल्या गेल्या आहेत. मात्र १९६८ आणि १९६९ साली काही राज्यातील सरकारे बरखास्त करण्यात आली त्यामुळे ही परंपरा खंडित झाली. तसेच १९७० साली मुदतीपूर्वीच लोकसभा विसर्जित करण्यात आली त्यामुळे देशात एकत्र निवडणुका होऊ शकल्या नाहीत. अर्थात एक देश एक निवडणूक ही संकल्पना अतिशय चांगली आहे. एक देश एक निवडणूक झाल्यास पैशाची व वेळेची मोठी बचत होईल. आपल्याकडे लोकसभे सारख्या मोठ्या निवडणुका असल्या की जवळपास दोन महिने सोहळा चालतो. त्याच्या आधी दीड दोन महिने आचारसंहिता. त्यानंतर विधानसभा, स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका अशा कोणत्या ना कोणत्या निवडणुका वर्षभर चालूच असतात. प्रत्येक निवडणुकी आधी महिना दीड महिना आचारसंहिता असते त्यामुळे विकासकामांना खीळ बसते. शिवाय देशात निवडणुकीवर हजारो कोटींचा खर्च होतो. यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीचा खर्च अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत होणाऱ्या खर्चापेक्षा अधिक होता. हा खर्च फक्त लोकसभा निवडणुकीचा आहे. विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीवर देखील असाच अवाढव्य खर्च होतो. एक देश एक निवडणूक झाली तर देशाचा पैसा आणि वेळही वाचेलच त्यासोबतच विकास कामांना खीळही बसणार नाही. मात्र एक देश एक निवडणूक ही संकल्पना कितीही लोभस वाटत असली तरी तिची अंमलबजावणी करणेही तितके सोपे नाही. मुळात भारतासारख्या खंडप्राय देशात जिथे एक अब्जाहून अधिक मतदार आणि शेकडो राजकीय पक्ष आहेत तिथे ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे ही मोठी तारेवरची कसरत आहे. एक देश एक निवडणूक ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरीच पुरेशी नाही तर त्यासाठी घटना दुरुस्ती करावी लागेल. सरकारला जर ही घटना दुरुस्ती करायची असेल तर सर्व पक्षाचा पाठिंबा मिळावा लागेल. आज या संकल्पनेला काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांचा विरोध आहे. एक देश एक निवडणूक ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकारला सर्व पक्षांची मनधरणी करावी लागेल सर्वच पक्ष त्यासाठी तयार होतीलच असे नाही कारण अनेक राज्यात विरोधी पक्षांची सरकारे आहेत जर ही संकल्पना प्रत्यक्षात आणायची असेल अनेक राज्यातील विधानसभांचा कालावधी वाढवावा किंवा कमी करावा लागेल. ज्या राज्यातील विधानसभेचा कालावधी कमी करायचा असेल तेथील सरकार बरखास्त करावे लागेल आणि जिथे वाढवायचा असेल तिथे राष्ट्रपती राजवट आणावी लागेल त्यासाठी तेथील सरकार तयार होईलच असे नाही यासाठी सरकारला सर्व पक्षांची सहमती घडवून आणावी लागेल. तूर्त ती शक्यता धूसरच दिसते. विरोधी पक्ष त्यासाठी सहजासहजी तयार होईल असे वाटत नाही. त्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळाने हा प्रस्ताव मंजूर केला तरी त्याला सर्व सहमती मिळेल असे वाटत नाही.

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्येच आता कॅन्सर रुग्णांसाठी किमोथेरपी सुविधा

- जिल्ह्यातील कॅन्सरच्या रुग्णांना मोठा दिलासा
- पालकमंत्र्यांच्या संकल्पनेतून किमोथेरपी कक्ष सुरु
- रुग्णांवर आता यवतमाळातच होतील किमोथेरपी

**दैनिक आपला विदर्भ**

**यवतमाळ/प्रतिनिधी :** विविध प्रकारच्या कॅन्सरने ग्रस्त रुग्णांना किमोथेरपीद्वारे उपचार केले जातात. उपचाराची ही सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना नागपूर गाठावे लागते. यात रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांना आर्थिक तथा मानसिक त्रास सहन करावा लागतो. यवतमाळात ही सुविधा उपलब्ध करावी, अशी मागणी रुग्णांच्या नातेवाईकांनी पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडे केली होती. त्यानुसार सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कॅन्सर किमोथेरपी डे-केअर कक्ष सुरु करण्यात आला असून जिल्ह्यातील कॅन्सरच्या रुग्णांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

या सुविधचे उद्घाटन पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश जतकर, अधीक्षक डॉ. सुरेंद्र भुयार, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ.रोहिदास चव्हाण, कॅन्सर थेरपी तज्ञ डॉ.आशुतोष गावंडे आदी उपस्थित होते.

रुग्णांमध्ये विविध प्रकारचे कॅन्सर आढळतात. त्यात प्रामुख्याने महिलांमध्ये गर्भाशय तथा स्तनाचे कॅन्सर अधिक संख्येने आढळून येते. सोबतच तोंडाचे कॅन्सर, आतड्याच्या कॅन्सरचे सर्वसाधारणे निदान होते. अशा रुग्णांवर किमोथेरपी उपचार केले जातात. ही उपचार पद्धत खर्चिक आणि मानसिक त्रास देणारी आहे. त्यात जिल्ह्यात सरकारी रुग्णालयामध्ये ही सुविधा नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णास नागपूरला घेऊन जावे लागतात. वारंवार किमोथेरपी द्यावी लागत असल्याने रुग्ण व नातेवाईकांना त्रास होतो.

यवतमाळातच ही सुविधा उपलब्ध झाल्यास रुग्ण व नातेवाईकांना मोठा दिलासा मिळेल. त्यामुळेच ही सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी रुग्णांच्या नातेवाईकांनी पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडे केली होती. पालकमंत्र्यांनी अशी सुविधा निर्माण करण्याबात जिल्हाधिकारी व वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातांशी चर्चा करून यासाठी निधी उपलब्ध करून दिला होता. अवघ्या काही महिन्यात किमोथेरपी डे-केअर कक्ष सुपर स्पेशालिटी रुग्णालयात सुरु झाला आहे.

या कक्षात किमोथेरपीसाठी लागणाऱ्या औषधांसह आवश्यक साधने, साहित्य उपलब्ध करण्यात आले आहे. किमोथेरपी कक्षासाठी आवश्यक औषधे फार महागडी असतात. ही औषधे नियमित उपलब्ध राहतील, याची काळजी घेण्याच्या सूचना उद्घाटनप्रसंगी पालकमंत्र्यांनी केल्या. कक्ष नियमित आणि उत्तमपणे चालविण्यासाठी कॅन्सर थेरपी तज्ञ आवश्यक असते. यासाठी डॉ.आशुतोष गावंडे हे तज्ञ डॉक्टर या कक्षाला लाभले आहे



### कॅन्सर रुग्णांना दिलासा मिळेल - संजय राठोड

कॅन्सर रुग्णांना किमोथेरपीसाठी बाहेर जावे लागते. यात वेळ, पैसा जातो आणि मानसिक त्रासही सहन करावा लागतो. त्यामुळे ही सुविधा यवतमाळात सुरु करावी, अशी विनंती काही रुग्णांच्या नातेवाईकांनी माझ्याकडे केली होती. या कक्षामुळे यवतमाळात आता सुविधा निर्माण झाली आहे. हा कक्ष जिल्हा व लगतच्या कॅन्सर रुग्णांना मोठा दिलासा देईल, असा विश्वास आहे.

## रवींद्र वायकरांच्या जोगेश्वरी पूर्वच्या जागेवर भाजपचा दावा, लोकसभेची आकडेवारी सांगत देवेंद्र फडणवीसांकडे मागणी

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर रवींद्र वायकर यांनी जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या आमदार पदाचा राजीनामा दिला होता. जोगेश्वरीतून ते शिवसेनेचे आमदार म्हणून विजयी झाले होते. भाजप कार्यकर्त्यांनी जोगेश्वरीच्या जागेवर दावा केला आहे. भाजपच्या माजी नगरसेविका उज्वला मोडक यांनी पदाधिकाऱ्यांसह देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत या जागेवर दावा केला. भाजपनं जोगेश्वरी पूर्वची जागा लढवल्यास या ठिकाणी महायुतीचा उमेदवार विजयी होईल, असं पत्र देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आलं. शिवसेनेला जागा सोडल्यास या ठिकाणी महायुतीचा उमेदवार विजयी होणं अशक्य असल्याचा दावा देखील करण्यात आला आहे.

उज्वला मोडक या विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. जोगेश्वरी पूर्व या मतदारसंघाचं प्रतिनिधीत्व खासदार रवींद्र वायकर यांनी यापूर्वी केलेलं आहे. रवींद्र वायकर यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वातील शिवसेनेत प्रवेश केला होता.

## चेन्नई कसोटीत रविचंद्रन अश्विनचा डबल धमाका, भारतीय संघाचा मोठा विजय; बांगलादेशचं पाणीपत

**चेन्नई :** चेन्नई कसोटीत भारतीय क्रिकेट संघानं बांगलादेशचा २८० धावांनी पराभव केला आहे. धावांच्या बाबतीत भारताचा बांगलादेशविरुद्धचा हा सर्वात मोठा कसोटी विजय आहे. या विजयासह भारतानं २ कसोटी सामन्यांच्या मालिकेत १-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. बांगलादेशवर भारताचा हा १३वा विजय आहे. भारतानं बांगलादेशसमोर विजयासाठी ५१५ धावांचं महाकाय लक्ष्य ठेवलं होतं. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ दुसऱ्या डावात केवळ २३४ धावा करु शकला आणि सामना गमावला. अश्विन दुसऱ्या डावात भारतासाठी सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला, त्यानं ६ बळी घेतले. बांगलादेशची शेवटची विकेट रवींद्र जडेजानं घेतली.

कानपूरला होणार दुसरी कसोटी : चेन्नई कसोटीतील पराभवामुळं बांगलादेशची भारताविरुद्ध कसोटी सामना जिंकण्याची इच्छा अजूनही अपूर्ण आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यातील चेन्नई कसोटी चार दिवसही टिकली नाही. चौथ्या दिवशी पहिल्या सत्रात खेळ संपला. आता दोन्ही संघांमधील दुसरी आणि शेवटची कसोटी कानपूरमध्ये खेळवली जाणार आहे.

चेन्नई कसोटीत बांगलादेशनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी दिली. अवघ्या ३४ धावांवर रोहित, गिल आणि विराटच्या विकेट घेतल्यावर त्यांचा हा निर्णयही सार्थ ठरत असल्याचं दिसून आले. मात्र यानंतर भारताचा डाव पंत आणि यशस्वीनं सांभाळला, जो अश्विन आणि जडेजा या जोडीनं केलेल्या अप्रतिम फलंदाजीमुळे आणखी मजबूत झाला. पहिल्या डावात अश्विननं ११३ धावा केल्या तर जडेजा ८६ धावा करुन बाद झाला. याशिवाय यशस्वी जैस्वालनं ७० धावांची खेळी केली. परिणामी भारतीय संघानं ३७६ धावांची मोठी धावसंख्या उभारली. बांगलादेशकडून पहिल्या डावात सर्वात यशस्वी गोलंदाज हसन महमूदनं ५ बळी घेतले.

भारताला पहिल्या डावात २२७ धावांची आघाडी : भारताच्या ३७६ धावांच्या प्रत्युत्तरात बांगलादेशचा पहिला डाव केवळ १४९ धावांवर आटोपला. जसप्रीत बुमराहनं पहिल्या डावात गोलंदाजीत ४ विकेट घेतल्या. तर आकाशदीप, जडेजा आणि सिराजने २-२ विकेट घेतल्या. भारताला पहिल्या डावात २२७ धावांची भक्कम आघाडी मिळाली होती.

पंत आणि गिलची दुसऱ्या डावात शतकं : पहिल्या डावात २२७ धावांची आघाडी घेतल्यानंतर भारतानं दुसरा डाव ४ गड्यांच्या मोबदल्यात २८७ धावांवर घोषित केला आणि बांगलादेशसमोर ५१५ धावांचं लक्ष्य ठेवले. भारतासाठी अश्विननं पहिल्या डावात शतक ठोकले तर पंत आणि गिलनं दुसऱ्या डावात शतकं झळकावली. ऋषभ पंत १०९ धावा करुन बाद झाला तर शुभमन गिल ११९ धावा करुन नाबाद राहिला.

अश्विन भारताच्या विजयात सामनावीर : भारतानं दिलेल्या ५१५ धावांच्या डोंगराएवढ्या लक्ष्यासमोर बांगलादेश दुसऱ्या डावात विजयापासून २८० धावा दूर राहिला. पहिल्या डावात विकेट घेण्यात अपयशी ठरलेला अश्विन दुसऱ्या डावात संघाचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. दुसऱ्या डावात त्यानं ६ बळी घेतले. चेन्नई कसोटीत शतक आणि ६ विकेट्स घेतल्याबद्दल त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

# माजी खासदार इम्तियाज जलील समृद्धी महामार्गाने तिरंगा रॅली घेऊन मुंबईत धडकणार

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मुस्लिम समाजाविरोधात घडत असलेल्या निंदनीय घटनेंविरोधात, कोणत्याही प्रकारचे अनुचित घटना घड्डु नये आणि समाज जीवनातील एकोपा, सामाजिक बंधूभाव धोक्यात येऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवु नये याकरिता योग्य त्ती कार्यवाही मुख्यमंत्री व प्रशासनाने घेतली नाही म्हणून आम्ही तिरंगा रॅलीच्या माध्यमातून आमचा निषेध नोंदवत आहोत असे इम्तियाज म्हणाले.महाराष्ट्र राज्यात अल्पसंख्यांक मुस्लिम समाजातील लोकांना मानसिक, आर्थिक त्रास देऊन सर्वांगिण विकासाच्या मुख्य प्रवाहापासुन दुर करावे तसेच त्यांचे जीवनमान खालवुन खच्चीकरण व्हावे या उद्देशाने विविध प्रकारचे षड्यंत्र रचुन अन्याय व अत्याचार केला जात असल्याचे आपल्या निदर्शनास येईल, विविध प्रसार



माध्यमावर खुलेआम मुस्लिम धर्माची व धर्मगुरुची प्रतिमा मलीन होईल आणि दोन समाजामध्ये मने कलुषित करून जातीय तणाव, धार्मिक द्वेष पसरवण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न होत असुन कोणत्याही प्रकारे फक्त समस्त मुस्लिम बांधवांचे धार्मिक भावना दुखावले जावे याकरिता निच कृत्य केले जात आहे.

विशेष म्हणजे जातीय दंगल घडविण्याच्या इराद्याने व्यक्तव्य होत असल्याचा संशय आहे. मुस्लिम समाजाविरोधात घडत असलेल्या निंदनीय घटनेविरोधात, कोणत्याही प्रकारचे अनुचित घटना धडु नये आणि समाज जीवनातील एकोपा, सामाजिक बंधूभाव धोक्यात येऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या कारणास्तव दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी लोकशाही मार्गाने शांततापूर्ण पध्दतीने मुंबई पर्यंत ''तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यामध्ये महाराष्ट्रातील विविध भागातून सर्वसामान्य नागरीकांचा मोठ्या प्रमाणात सक्रीय सहभाग असणार आहे. तिरंगा रॅलीतील प्रमुख मागण्या- रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज, सरला बेट यांनी मौजे पंचाळे, ता. सिन्नर, जि. नाशिक या ठिकाणी सप्ताहा दरम्यान प्रवचनामध्ये उपस्थित जनसमुदायासमोर प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांचा अपमान करण्याचा प्रयत्न, मुस्लिम धर्माची व धर्मगुरुची प्रतिमा मलीन होईल, आणि दोन समाजामध्ये मने कलुषित करुन जातीय तणाव, धार्मिक द्वेष पसरवण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न केल्याने त्यांच्या विरोधात संपुर्ण महाराष्ट्रात ६० हुन जास्त गुन्हे दाखल झाले असुन त्यांना तात्काळ अटक करावी. दोन समाजात धार्मिक तेढ निर्माण करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवावा म्हणून जाणुनबुजुन प्रक्षोभक आणि चिथावणीखोर भाषण करत असलेला नितेश राणे यांच्या विरोधात कठोर कारवाई करुन तात्काळ अटक करण्यात यावी असे यावेळी माजी खासदार इम्तियाज जलील म्हणाले आहेत

## दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीलाही तृप्ती डिमरीची भुरळ?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेत्री तृप्ती डिमरीनं ॲनिमल या चित्रपटानंतर मागे वळून पाहिलेलं नाही. तिला एकामागेएक असे चित्रपट मिळत आहेत. काही दिवसांपूर्वीच तिचा 'बॅड न्यूज' हा चित्रपट प्रदर्शित झाला. आता राजकुमार रावसोबत 'विक्की विद्या का वो वाला व्हिडीयो'मध्ये ती दिसणार आहे. इतकंच नाही तर बॉलिवूडमध्ये स्वत:ची छाप सोडल्यानंतर तृप्ती आता दाक्षिणात्य सुपरस्टार धनुषसोबत स्क्रिन शेअर करताना दिसणार आहे. या सगळ्या चर्चांवर 'तेरे इश्क में' या चित्रपटाचे दिग्दर्शक आनंद एल राय यांनी त्यांची प्रतिक्रिया दिली आहे.

दिग्दर्शक आनंद एल राय यांनी नुकतीच 'झूम'ला मुलाखत दिली होती. 'पीपिंगमून'च्या रिपोर्टनुसार, असं म्हटलं जात आहे की या चित्रपटात तृप्ती डिमरीला कास्ट करण्याविषयी विचारण्यात आल्यानंतर त्यांनी त्यांची प्रतिक्रिया देत सांगितलं या सगळ्या चर्चा तशाच सुरु राहू द्या. मी लवकरच चित्रपटाच्या कास्टिंगविषयी सांगेन.'

'तेरे इश्क में' या चित्रपटाविषयी बोलायचे झाले तर या चित्रपटाची घोषणा गेल्यावर्षी झाली होती. धनुष हा त्याच्या दुसऱ्या प्रोजेक्टमध्ये व्यग्र असल्यामुळए चित्रपटाला उशिर झाला. आता या चित्रपटाच्या शूटिंगविषयी बोलायचे झाले तर ऑक्टोबरमध्ये चित्रपटाचं शूटिंग सुरु होणार आहे. सगळ्यात लक्षवेधी गोष्ट म्हणजे धनुषच्या या चित्रपटाचं कनेक्शन हे त्याचा २०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'रांझणा' शी असणार आहे. त्याचा हाच चित्रपट त्यावेळी सुपरहिट ठरला होता. तर आनंद एर राय यांनीच या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते आणि त्या चित्रपटात सोनम कपूर देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसली होती. तिच्याशिवाय या चित्रपटात अभिनेत्री स्वरा भास्कर देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसली होती. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाच्या कलेक्शनविषयी बोलायचे झाले तर ३६ कोटी या चित्रपटाचं बजेट होतं. तर या चित्रपटाच्या त्यापुढे जात ९४ कोटींचं बॉक्स ऑफिसवर कलेक्शन केलं होतं.

# नवनिर्वाचित शिवसेना महिला आघाडी पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने नवनिर्वाचित शिवसेना महिला आघाडी पदाधिकाऱ्यांचा रविवार, २२ सप्टेंबर रोजी सत्कार करण्यात आला. शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी समर्पण भावनेने कार्य करण्याच्या शुभेच्छा दिल्या. सहसंपर्क संघटक आनंदीताई अन्नदाते, सुनिताताई देव, अनिताताई मंत्री, दुर्गाताई भाटी,जिल्हा संघटक आशाताई





दातार, लताताई पगारे, राखीताई परदेशी, जिल्हा समन्वयक विद्याताई अग्रिहोत्री, देवयानीताई डोणगावकर, नंदाताई ठोंबरे, महानगर संघटक सुकन्या भोसले, मीना फसाटे, शहर संघटक सुनिता औताडे, वैशाली आरट, उपजिल्हा संघटक ठकुबाई कोथंबिरे, विधानसभा संघटक कविता सुरळे, मीरा देशपांडे, सीमा खरात, राजश्री राणा, विधानसभा समन्वयक रेणूका जोशी व अंजना गवई यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. हिंदूहृदयसम्राट,शिवसेनाप्रमूख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आपली सर्वांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाने आपल्या सर्वांवर मोठी जबाबदारी सोपवली असून या संधीचे पक्षाच्या बांधणीच्या कामकाजात रूपांतर करा असे, आवाहन दानवे यांनी यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना केले. कर्तुत्ववान आणि सक्षम पदाधिकाऱ्यांची या पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. निश्चितपणे आगामी काळात आपण सर्व पदाधिकारी मजबूतपणे पक्षाची ध्येय आणि धोरणे गाव व वॉर्डापर्यंत पोहोचवतील अशी अपेक्षा व्यक्त करत नवनवीन संकल्पना, सातत्याने गाव पातळीपर्यंत भेटी, पदाधिकाऱ्यांच्या बैठका आणि वेगवेगळे कार्यक्रम राबविण्याची सूचना यावेळी अंबादास दानवे यांनी केली. हिंदूहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जी आमच्यावर जबाबदारी सोपवली आहे, ती सार्थ ठरवू. आगामी काळात विधानसभा निवडणुकीत तसेच पुढेही पक्षात्मक बांधण्यासाठी अविरत कार्य सूरू राहिलं, असे आश्र्वासन देत उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदी बसविण्याचा आमचा संकल्प असून या कार्यासाठी येणाऱ्या काळात निष्ठापूर्वक काम करू,अशी एकसुराने महिला पदाधिकाऱ्यांनी यावेळी भावना व्यक्त केली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी ताकद पणाला लावून महायुतीचे आमदार मोठ्या संख्येने विजयी करावेत

## शिवसेना मेळाव्यात अलोट गर्दी, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : राज्य व केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात केलेली लोकहिताची कामे, घेतलेले विक्रमी निर्णय याबाबतची माहिती लोकांना द्यावी. शिवसेना पदाधिकारी कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकद पणाला लावली तर इथे एकतर्फी विजय सहज शक्य आहे. आपली सर्व क्षमता वापरून महायुतीच्या सर्व आमदारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी आज पासूनच कामाला लागा ,असे आवाहन केंद्रीय आयुष,आरोग्य,कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

स्थानिक वृंदावन लॉन सभागृहामध्ये आज मेहकर ,लोणार तालुक्यातील शिवसेनेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला त्यात मार्गदर्शन करताना नामदार प्रतापराव जाधव यांनी वरील आवाहन केले. आपल्या दीड तासाच्या घणाघाती व अभ्यासपूर्ण भाषणातून कार्यकर्त्यांमध्ये त्यांनी स्फुल्लिंग पेटवले. खोटा नाट्या गोष्टी सांगून लोकांची दिशाभूल करणाऱ्या विरोधकांचाही त्यांनी खरपूस शब्दात समाचार घेतला. आमदार संजय रायमुलकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. बळीभाऊ मापारी, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव , उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गाडेकर, तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, भगवानराव सुलताने, शहर प्रमुख जयचंद बाठीया, पांडुरंग सरकटे, महिला आघाडीच्या कविताताई दांदडे, वैशालीताई सावजी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक बळीभाऊ मापारी यांनी केले. आपल्या भाषणात प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की,लोक छोट्याछोट्या गोष्टींचा राग निवडणुकीत काढतात हे टाळले गेले पाहिजे. जनता आपले लोकप्रतिनिधी विकास कामांसाठी निवडून देते. मेहकर मतदार संघात मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाली आहेत .राज्य व केंद्र सरकारने विविध लोकोपयोगी योजनांच्या माध्यमातून लक्षणीय काम केले आहे. एक रुपयात पिकविमा योजना,मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, मुलींच्या उच्च शिक्षणाचा पूर्ण खर्च शासन करणार, पाच लाख रुपयांपर्यंतचा मोफत वैद्यकीय उपचार करण्यासाठी आयुष्यमान भारत व इतर योजना, महिला व वयोवृध्द प्रवाशांसाठी एसटीच्या विविध योजना, शेतकऱ्यांना मिळणारे किसान सन्मान योजनेचे पैसे , कृषी पंपांची केलेली पूर्ण विज बिल माफी आदींबाबत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी लोकांमध्ये प्रचार प्रसार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

लाडकी बहीण योजनेला विरोध करत काँग्रेसचे लोक न्यायालयात गेले, इतर चांगल्या योजनांनाही ते विरोध करत आहेत, असे सांगून नामदार जाधव पुढे म्हणाले की, वैनगंगा, नळगंगा, पैनगंगा ८० हजार कोटींचा नदीजोड प्रकल्प विदर्भाला वरदान ठरणार आहे .त्याचे टेंडरही झाले आहेत. त्यातून आपली शेती बारमाही ओलिताची होणार आहे. आम्ही सदैव लोकांच्या सुखदुःखात सहभागी होतो, परिसराचा विकास करतो. मात्र कधीही लोकांच्या सुखदुखात न दिसणारे लोक फकत निवडणुकीच्या मोसमात



उभे राहतात . निवडणुका संपल्या की, पराभूत होऊन ते परत जातात, ते पुन्हा दिसत नाहीत, अशी टीकाही त्यांनी केली. पदाधिकारी कार्यकर्त्यांनी प्रत्येक गावामध्ये विकास कामांबद्दल लोकांना सांगावे, भरपूर मतदान करून घ्यावे, असेही त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले. लोकसभा निवडणुकीत ज्यांनी चुका केल्या त्यांनी आता त्या दुरुस्त कराव्यात.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुढील पाच वर्षात पुन्हा मुख्यमंत्री राहिले तर महाराष्ट्राचा कायापालट होईल, असेही ते म्हणाले. उलट्यासुलट्या, खोट्या बदनामीकारक पोस्ट जर कोणी उपद्व्यापी समाज माध्यमावर टाकत असतील तर त्यांना गावागावांमध्ये जागीच ठेचा, असा थेट आदेशही प्रतापराव जाधव यांनी शिवसैनिकांना दिला.

आपल्या भाषणात आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, प्रतापराव जाधव यांच्या रूपाने जिल्ह्याला एक मोठे सक्षम नेतृत्व लाभलेले आहे. मेहकर लोणार तालुक्यात गेल्या अडीच वर्षात मुख्यमंत्री शिंदे यांच्या सहकार्याने ३हजार ९०० कोटींची विकास कामे आपण केली. शासनाच्या सर्व योजनांचा फायदा तळागाळातल्या माणसांना मिळवून दिला. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून प्रत्येक घरामध्ये मोठ्या प्रमाणात रोख रक्कम येत आहे, असेही ते म्हणाले. मतदार संघ हा माझा परिवार असून सातत्याने इथला विकास करत राहण्याचे माझे ध्येय आहे. पदाधिकारी कार्यकर्ते यांनी आतापासून जोमने कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले.

आजच्या मेळाव्याला चार हजाराहून अधिक पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते. संतोष मापारी, अक्काताई गायकवाड, नीरज रायमुलकर,दिलीपराव देशमुख,प्रा.सचिन जाधव, अशोक वारे, सचिन मगर,डॉ. काशिनाथ घुगे, विजय सानप, भगवानराव कोकाटे,बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, रविराज रहाटे ,कैलास चवरे,हिम्मतराव सानप, राजू मुंदडा, नितीन राऊत, हर्षल कुसळकर, राजीव तांबिले, हर्षल गायकवाड, समाधान साबळे, अशोक पसरटे आदिलसह अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सातपुते यांनी केले. सुरेशतात्या वाळूकर यांनी आभार मानले.

## संक्षिप्त...

### फळ विक्रेता प्लास्टिकच्या पिशवीत लघुशंका करत त्याच हाताने फळे ग्राहकांना देतानाचा व्हिडियो व्हायरल: मानपाडा पोलीसानी फळ विक्रेत्याला घेतलं ताब्यात

दैनिक आपला विदर्भ



**कल्याण/प्रतिनिधी** : एक फळ विक्रेता प्लास्टिकच्या पिशवीत लघुशंका करत त्याच हाताने फळे ग्राहकांना देतानाचा व्हिडियो व्हायरल झाला होता. डोंबिवली निळजे परिसरातील एका फळविक्रेत्याचा हा व्हिडीओ होता. या व्हिडियो नंतर परिसरात संतापाची लाट पसरली आहे. या व्हायरल व्हिडियोची दखल घेत मानपाडा पोलिसांनी तत्काळ फळविक्रेता अली खान याला ताब्यात घेत चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या किळसवाण्या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट पसरली आहे.

### आपली भेट लवकरच होईल... बिग बॉसमधून एक्झिट घेताच संग्राम चौघुलेची पहिली पोस्ट, नेमकं काय म्हणाला?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : 'बिग बॉस मराठी ५' चा गाजावाजा सर्वत्र आहे. सोशल मीडियावरही सतत याचीच चर्चा पाहायला मिळते. घरात काय घडतं याविषयी बाहेरची प्रचंड प्रतिसाद उमटताना दिसतात. नुकताच वाईल्ड कार्ड एन्ट्री घेणारा संग्राम संग्राम चौघुले बिग बॉसच्या बाहेर गेला आहे. त्याच्या वैद्यकीय इमर्जन्सीमुळे त्याला बिग बॉसच्या घरातून एक्झिट घ्यावी लागली. संग्राम बाहेर येताच त्याने सोशल मीडियावर पहिली पोस्ट शेअर केली आहे. त्याची ही पोस्ट चांगलीच व्हायरल होतेय.

बिग बॉसमधून इमर्जन्सी एक्झिट घेतल्यानंतर आता संग्राम चौघुलेनं इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्याची ही पोस्ट प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेत आहे. या पोस्टमध्ये संग्रामने लिहिलं, ''मला झालेल्या काही स्ररदी ग्हरलीगे मुळे घरातून बाहेर जावं लागलं, तुम्ही आजपर्यंत जे प्रेम दिलं ते मी सोबत घेऊन जातोय आणि तुमच्या सगळ्यांचा प्रेमंच मला लवकर ीम्दनी व्हायला मदत करेल!''

संग्रामने पोस्टमध्ये असेही लिहिलेय, ''आपली भेट लवकरच होईल. तुम्ही दिलेल्या प्रेमासाठी धन्यवाद.'' त्यामुळे आता संग्राम रिकव्हर झाल्यावर पुन्हा बिग बॉसच्या घरात एन्ट्री घेणार का? असा प्रश्न प्रेक्षकांना पडला आहे. प्रेक्षकांनी संग्रामवर नाराजीही व्यक्त केली आहे. बॉडी बिल्डर असून लगेच कसा त्रास होऊ शकतो, उगाच काहीतरी कारण सांगून बाहेर पडत आहे, अशा अनेक गोष्टी प्रेक्षक बोलत आहेत.

दरम्यान, अंड्याच्या टास्कमध्ये सदस्यांमध्ये रेटारेटी झाली ज्यात संग्रामच्या हाताला दुखापत झाली. त्याच्या मनगटाला दुखापत झाली असून हेअर लाईन फ्रॅक्चर झाली आहे. त्यामुळे त्याला पुढील उपचारासाठी एक्झिट घेणं गरजेचं होतं.

### जुलूस मिरवणुकीत झेंडा फडकवताना दोघांना विजेचा शॉक; एकाचा मृत्यू, एक जखमी

**पुणे/प्रतिनिधी** : पुण्यात जुलूस मिरवणुकीत झेंडा फडकवताना दोघांना विजेचा शॉक लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पुण्यातील चंदन नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील वडगाव शेरी या परिसरात आज (रविवार) ईदच्या निमित्ताने जुलूस मिरवणुकीत सुरू असताना दोन मुलांकडून हातात झेंडा फडकत असताना वरती एका विजेचे तारेला चिटकले. या दोन्ही मुलांना विजेचा जोरदार झटका बसला. या घटनेमध्ये एका मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर, दुसरा गंभीररित्या जखमी आहे. ज्याच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुण्यातील चंदन नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील वडगाव शेरी परिसरात ही घटना आज अर्ध्या तासापूर्वी घडली आहे. या घटनेत एकाचा मृत्यू झाला आहे, तर एक गंभीर रित्या जखमी झाला आहे. जवळच्या रुग्णालयात जखमेवर उपचार सुरू आहेत. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### मेरठमधील प्रसिद्ध व्यावसायिकांच्या घरांवर ईडीचे छापे; ३२ कोटींचे हिरे जप्त, माजी आयएएसचे नावही समोर

**मेरठ** : मेरठ जिल्ह्यातील प्रसिद्ध निर्यात व्यावसायिकांच्या घरांवर ईडीनं टाकलेल्या छाप्यात तब्बल ३२ कोटी रुपयांचे हिरे सापडले आहेत. गेल्या पाच दिवसांपासून ईडीचे पथक शहरात तळ ठोकून आहे. या प्रकरणात आता माजी आयएएस अधिकाऱ्याचं नावही समोर आलंय. माजी आयएएसच्या संगनमतानं या प्रकल्पात गुंतवणुकीच्या नावाखाली ४२६ कोटी रुपयांचा गंडा घातल्याचं सांगण्यात येतंय. तसंच मनी लॉड्रिंगच्या माध्यमातूनही फसवणूक करण्यात आली होती. ईडीच्या या छाप्यानंतर शहरात एकच खळबळ उडाल्याचं बघायला मिळतंय. ईडीच्या पथकानं दिल्ली, नोएडा, मेरठ, चंदीगड आणि गोव्यातील व्यावसायिकांच्या १२ ठिकाणांवर छापे टाकले. या काळात ४२.५६ कोटी रुपयांची रोकड आणि हिऱ्यांसह कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेची कागदपत्रं जप्त करण्यात आली. ईडीच्या तपासात अनेक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात माजी आयएएस अधिकाऱ्याचं नावही समोर आलंय. एक्स्पोर्ट कंपनीच्या मालकांकडं कोट्यवधी रुपयांची संपत्ती असल्याचं प्राथमिक तपासात समोर आलं आहे. तसंच हिरे कधी खरेदी करण्यात आलेत, याबाबत ईडी व्यावसायिकांची चौकशी करू शकते. ऑगस्ट २०२४ मध्ये, मेरठ विकास प्राधिकरणाकडून प्राइम लोकेशनवर ९१ कोटी रुपयांची जमीन बोली लावून खरेदी करण्यात आली. त्यावर ग्रुप हाउसिंग बांधण्याची तयारी सुरू आहे.

## पिंपरीत होणार मराठा समाजाचे धरणे आंदोलन

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात हजारों मराठा बांधव एकवटणार

दैनिक आपला विदर्भ



**पिंपरी/प्रतिनिधी** : गेल्या वर्षभरापासून मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी विविध प्रकारची आंदोलने सुरू आहेत याबाबत राज्य सरकारने वेळोवेळी विविध आश्र्वासने दिली परंतु ती पाळली नाहीत. मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट,बॉम्बे गॅझेट,लागू करावे सरकारने दिलेल्या आश्र्वासनां प्रमाणे सगे सोयरे बाबतच्या अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करावे. मराठा आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे सरसकट मागे घ्यावेत. या बरोबरच सरकारने वेळोवेळी दिलेल्या सर्व आश्वासनांची तात्काळ अंमलबजावणी करावी. या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी मनोज जरांगे पाटील गेल्या सहा दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण करत आहेत त्यांची तब्येत दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. याकडे सरकारने तात्काळ लक्ष द्यावे तसेच सर्व मागण्या मान्य कराव्यात यासाठी जरांगे पाटील यांच्या समर्थनात पिंपरी चिंचवड शहरातील सकल मराठा समाज आज सोमवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी येथे धरणे आंदोलन करणार आहे. यासाठी रविवारी दुपारी दोन वाजता मराठा समाजाची मीटिंग दिनकर भोईर व्यायाम शाळा चिंचवड येथे आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीत उपस्थित कार्यकर्त्यांनी सरकार करत असलेल्या चालढकली बाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच लवकरात लवकर सरकारने निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखीन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.सोमवारी होणाऱ्या धरणे आंदोलनात शहरातील मराठा बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले. या बैठकीस सचिन बारणे,सतीश काळे,प्रकाश जाधव,जीवन बोराडे,अभिषेक म्हसे,नकुल भोईर,अर्जुन खामकर वाल्मीक माने,प्रकाश बाबर,प्रशांत पाटील,सुलभा यादव,उज्वला साळुंखे,दिलीप गावडे,रमेश कदम,अच्युत मस्के,राज पाटील,यांच्यासह अनेक मराठा बांधव उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय कन्या दिनानिमित्त फडणवीसांची पोस्ट; लेकीला म्हणाले



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आज जगभर जागतिक कन्या दिन साजरा केला जात आहे. मुलींचं कोड कौतुक व्हावं, त्यांना आशीर्वाद मिळावेत याकरता हा दिन साजरा केला जातो. भारतातील स्त्रीभ्रूण हत्या थांबाव्यात याकरता या दिनाची सुरुवात झाली. त्यानिमित्ताने राज्याचे उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या लेकीला शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी एक्स पोस्टवर दोघांचाही सुंदर फोटोही शेअर केलाय. तसंच, राज्यातील अनेक नेत्यांनी आपल्या मुलींबरोबरचे फोटो शेअर केले आहेत.

''या आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त मुलींचा जन्म साजरा करूयात. त्यांना नेहमी नवीन उंची गाठण्यासाठी सक्षम करू या. माझ्या प्रिय दिविजाला कन्या दिनाच्या शुभेच्छा! माझा अभिमान, आनंद आणि शक्ती'', असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते पुढे म्हणाले, ''स्वप्नांना तुझ्या नवे पंख मिळू दे, भविष्याला तुझ्या नवा आकार मिळू देष्ठ आंतरराष्ट्रीय कन्या दिनाच्या शुभेच्छा!''

जितेंद्र आव्हाडांनीही शेअर केला जुना फोटो

जितेंद्र आव्हाड यांनीही एक जुना फोटो शेअर केलाय. या पोस्टमध्ये आव्हाड म्हणाले, ''हा माझा आणि माझ्या मुलीचा एक जुना फोटोष्ठ हा फोटो जेव्हा जेव्हा पाहतो ना तेव्हा मन रमतं जुन्या आठवणींतष्ठ. वाटतं ज्यांच्या घरी मुली आहेत ते नेहमी आनंदी असतात, त्यांचं घर हसतं खेळतं असते. नेहमी प्रसन्न असते. आणि हे घर आनंदी ठेवण्याची जबाबदारी तुम्हा सर्वांवर आहे. जितेंद्र आव्हाड यांच्या मुलीचं नाव नताशा आव्हड असून तिचं लग्न झालंय. लॉकडाऊन काळात अत्यंत साध्या पद्धतीने घरच्या घरी विवाहसोहळा पार पडला होता. त्यांच्या या सोहळ्याचं कौतुक करण्यात आलं होतं.

## ट्रम्प की कमला? भारतासाठी कोण योग्य? मोदींकडून अमेरिकन संसदेत कमलांचे कौतुक, ट्रम्प यांना चांगले मित्र म्हटले होते

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतीय वंशाच्या कमला हॅरिस आणि माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प २ महिन्यांनंतर ५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत आमनेसामने आहेत. याआधीच पीएम मोदी अमेरिकेत पोहोचले आहेत. ते न्यूयॉर्कमध्ये २५ हजार भारतीयांना संबोधित करणार आहेत. अमेरिकेत सुमारे ५० लाख भारतीय वंशाचे लोक राहतात. जे निवडणुकीत निर्णायक भूमिका बजावू शकतात. अशा परिस्थितीत मोदींचे निवडणुकीपूर्वी अमेरिकेला जाणे कोणासाठी फायदेशीर ठरेल, कमला आणि ट्रम्प यांचे मोदींशी कसे संबंध आहेत, भारतीय मुद्द्यांवर दोन्ही उमेदवारांची भूमिका काय आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पीएम मोदींनी १२ मिनिटे ट्रम्प यांचे सतत कौतुक केले

ट्रम्प आणि मोदी यांचे संबंध खूप घट्ट आहेत. दोघेही एकमेकांना चांगले मित्र म्हणतात आणि एकमेकांना खूप प्रेमाने भेटतात. सप्टेंबर २०१९ मध्ये मोदी जेव्हा अमेरिकेला गेले होते, तेव्हा त्यांच्यासाठी टेक्सासमध्ये ''हाऊडी मोदी'' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पंतप्रधान मोदींना ऐकण्यासाठी ५० हजार भारतीय आले होते.

## केनवड येथे टाळ मृदंगाच्या गजरात, सुमधुर गायनात

# श्रीगणेशाचे भव्यदिव्य विलोभनीय विसर्जन

दैनिक आपला विदर्भ

**केनवड/प्रतिनिधी** : गावामध्ये एकोपा टिकावा, कुठलाही वाद होऊ नये आणि धार्मिक वृत्ती अधिकाधिक बळकट व्हावी या उद्देशाने राजे संभाजी मित्र मंडळ केनवड यांनी छत्रपती शिवरायांसमोर आठवडी बाजारात स्थापन केलेल्या श्री गणेशाची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण गावात महिलांनी सडा टाकून,रांगोळी काढून, पूजा करून स्वागत केले.

शेतकऱ्यांचा साथी ट्रॅक्टरला फुले, हार, लाइटिंग ने सजवून श्री गणेशाला विराजमान करण्यात आले.

श्री गणेशा समोर ज्ञानसागर वारकरी शिक्षण संस्था भापूर येथील बाळ टाळकरी, युवा कीर्तनकार बालाजी महाराज बोडखे भापूरकर, मोहदरी येथील मृदंग विशारद महेश महाराज ढोरे, लोणी गवळी येथील गायक संजय महाराज पाटोळे, पेनबोरी येथील गायक रामेश्र्वर महाराज बोरकर यांनी आणि गावातील भजनी मंडळींनी आपल्या सुमधुरवाणीने आणि मृदंग टाळा च्या गजराने केनवड नगरी दुमदुमून सोडली.

राजे संभाजी मित्र मंडळाने अतिशय सुरेख असे नियोजन केले होते. डोक्यावर तुळशी वृंदावन, गळ्यात टाळ, कपाळी टिळा लावून शेकडो महिला, प्रत्येक पुरुषाच्या डोक्यावर पांढरी टोपी, कपाळी गंधक बुक्का याचा टिळा लावून शेकडो युवक वारकरी सहभागी झाले होते.

संपूर्ण गावात प्रदक्षिणेदरम्यान युवक, वारकरी,महिला यांनी टाळ मृदंगाच्या ठेक्यावर चौका चौकात पाऊली आणि फुगड्या खेळल्या. संपूर्ण गावात मिरवणुकीत धार्मिक,देशभक्ती आणि ऐतिहासिक गीत गायन झाले. हे सर्व रमणीय दृश्य पाहून प्रत्येक माणूस भारावून गेला होता. गावातील मिरवणूक संपल्यानंतर प्रत्येक ज्येष्ठ श्रेष्ठ माणसाच्या तोंडातून अशीच मिरवणूक प्रत्येक ठिकाणी निघावी अशीच भावना होती.

आजच्या काळात डी.जे.चा कर्कश आवाज आणि अश्र्लील गाण्यावर नृत्य करून मिरवणूक काढणाऱ्यांना हा एक उत्तम संदेश या मंडळाने दिला.आणि असाच पायंडा पडावा अशी भावना व्यक्त केली.



## विविध वृत्त...

### शेख जावेद शेख हबीब यांची अल्पसंख्यांक बुलढाणा जिल्हा महामंत्री पदी निवड

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**दुसरबीड :** दुसरबिड येथील भाजपा कार्यकर्ते शेख जावेद शेख हबीब यांची अल्पसंख्यांक महामंत्री पदी नियुक्ती करण्यात आली नियुक्तीपत्र देताना चिखली विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्वेताताई महाले पाटील, डॉ.सुनील भाऊ कायदे, प्रदेश उपाध्यक्ष ओबीसी मोर्चा महाराष्ट्र, शेख अनिस शेख बुढन जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा, सलीम परवेज खान प्रदेश सचिव भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा महाराष्ट्र शिवराज शापते राज्य पत्र देताना उपस्थित होते

### सर्व जातींची गणना होणे आवश्यक : केंद्रीय मंत्री रामदास आठवले



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** जातनिहाय गणना केली पाहिजे. केवळ ओबीसीची नाहीतर, सर्व जातींची गणना होणे आवश्यक आहे. यासंदर्भात आपण संसदेत मागणी पण केली. पण काही तांत्रिक अडचणींमुळे ती होण्यास उशीर होत आहे. २०११ च्या आकडेवारीनुसार सध्या चाललेय, अशी भूमिका केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत मांडले. ही भूमिका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही घेतली आहे. त्यामुळे तुम्ही राहुल यांच्या भूमिकेशी सहमत आहात काय, असे विचारले असता, राहुल माझ्या भूमिकेशी सहमत आहेत, मी नाही, असे मिश्किल उत्तर त्यांनी दिले. ते आज चंद्रपुरात माध्यमांशी बोलत होते.

### सोयाबीन प्रश्नावरुन आमदार नितीन देशमुख झाले आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख आज सोयाबीन प्रश्नावरून चांगलेच आक्रमक झाले आहेत. कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांना सोबत घेत देशमुखांनी पालकमंत्री विखे पाटील यांना सोयाबीन प्रश्नावर धारेवर धरले होते. मंत्री विखे पाटील अकोल्याच्या शासकीय विश्रामगृहात उपस्थित असतानाच शेतकऱ्यांनी आणि ठाकरेंच्या शिवसैनिकांनी त्यांच्याकडे धाव घेतली आहे. तर हातात सोयाबीन पिके घेत शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या आहेत. सततच्या पावसामुळे अकोला जिल्ह्यात अनेक भागात सोयाबीन उत्पादक शेतकरी चांगलाच अडचणीत आला आहे. सध्यास्थित शेतकऱ्यांच्या सोयाबीनला शेंगा लागल्या नाहीत तर परिणामी पेरणीचा खर्च निघत नाही आहे अशी परिस्थिती आज शेतकऱ्यांसमोर उभी आहे. त्यांच्या मागाण्यांवर विचार होईल असे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले आहेत.

### नितेश राणेंच्या वक्तव्याला सरकारचाच पाठिंबा; जयंत पाटील यांचा घणाघात



**धुळे/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची शिव संवाद यात्रा आज शिरपूर येथे आलेली असताना यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नितेश राणे यांचा चांगलाच समाचार घेतला आहे. आमदार नितेश राणेंच्या वादग्रस्त वक्तव्याबाबत बोलताना जयंत पाटील म्हणाले की त्यांच्या वक्तव्याला सरकारचा पाठिंबा असून महाराष्ट्रात वादग्रस्त विधान करून गोंधळ घालण्याचा हा प्रयत्न सत्ताधारी पक्षातील लोक करत असून अशा वादग्रस्त विधानबाबत तात्काळ गुन्हा दाखल होणे आवश्यक होते मात्र तसे झाले नाही. येत्या निवडणुकीत पराभव डोळ्यासमोर दिसत असल्याने ही शेवटची खेळी असल्याचं म्हणत जयंत पाटील यांनी नितेश राणे यांच्यासह सरकारवर ताशेरे ओढले.

# मेहकर विधानसभा मतदारसंघात 'तगडा' उमेदवार देणार - रविकांत तुपकर

## मेहकरातील बैठकीत ताकदीने लढण्याचा कार्यकर्त्यांचा निर्धार

### शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आंदोलनाच्या तयारीला लागण्याचे रविकांत तुपकरांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी :** शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी येणारी विधानसभा निवडणूक आपल्यासाठी महत्त्वाची आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघात शेतकरी,कष्टकरी व तरुणांची ताकद लोकसभेत दिसून आली आहे. त्यामुळे आता येणाऱ्या विधानसभेत मेहकर मतदारसंघातून तगडा उमेदवार देऊन पूर्ण ताकदीने हा मतदारसंघ लढविणार असल्याची घोषणा रविकांत तुपकर यांनी केली. मेहकर विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत रविकांत तुपकर बोलत होते. येणाऱ्या काळात आपल्याला शेतकऱ्यांच्या हक्कासाठी मोठे आंदोलन उभे करायचे असून या आंदोलनाच्या तयारीला लागण्याचे आवाहन देखील रविकांत तुपकरांनी केले.

रविकांत तुपकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मेहकर विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आज मेहकर येथील के.जी. एन.कॉम्प्लेक्स मध्ये अतिशय उत्साहात पार पडली. या बैठकीत सोयाबीन-कापूस उत्पादकांसाठी होणाऱ्या आंदोलनाचे टप्पे ठरविण्यात आले, त्याचबरोबर आक्रमक आंदोलनाची दिशाही ठरविण्यात आली. तसेच संघटनात्मक बांधणी व आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने कामाला लागण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. मेहकर विधानसभा मतदारसंघात आपली मोठी ताकद आहे.

शेतकरी, शेतमजूर, सर्वसामान्य जनता तरुण, अशा सर्वच घटकातील नागरिक आपल्या पाठीशी आहेत, याचा प्रत्यय लोकसभा निवडणुकीत आपल्याला आला आहे. शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून मेहकर मतदार संघातून चांगला उमेदवार द्यावा, अशी मागणी या मतदारसंघातून सर्वसामान्य जनतेचे होत आहे. त्यामुळे मेहकर विधानसभा मतदारसंघात शेतकरी-कष्टकऱ्यांचा अतिशय ताकदीचा उमेदवार असेल व मेहकर विधानसभा अतिशय ताकदीने लढविणार, अशी घोषणा यावेळी रविकांत तुपकरांनी केली.

तसेच सोयाबीन- कापूस आंदोलनासाठी तयारीला लागण्याच्या सूचनाही तुपकरांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिल्या. रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून याप्रसंगी अनेक तरुण या चळवळीच्या प्रवाहात सहभागी झाले, त्यांचे रविकांत तुपकरांनी स्वागत केले. डॉ.ज्ञानेश्वर टाले यांच्या पुढाकारातून या बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. तर या बैठकीला मेहकर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'माझी फसवणूक झाल्यासारखं वाटतं', उपमुख्यमंत्री पवन कल्याण ११ दिवसांचा उपवास करणार

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** आंध्रप्रदेशमधील तिरुपतीस्थित श्री वेंकटेश्वर मंदिरामध्ये प्रसाद म्हणून वाटप केल्या जाणाऱ्या लाडवांच्या नमुन्याम ध्ये निम्न दर्जाचे तूप आणि प्राण्यांची चरबी आढळल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर एकच खबळबळ उडाली. या प्रकरणी माजी मुख्यमंत्री आणि वायएसआरसीपीचे अध्यक्ष जगन मोहन रेड्डी यांच्याकडे अंगुलीनिर्दे श केले जात असून आंध्रप्रदेशचे राजकारण तापले आहे. त्यातच आता आंध्रचे उपमुख्यमंत्री आणि अभिनेते पवन कल्याण यांनी प्रायश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. मी प्रसादाच्या लाडूमधील भेसळ रोखू शकलो नाही, त्यामुळे मला आतून फसवणूक झाल्यासारखे वाटत आहे. यासाठी मी ११ दिवसांचा उपवास करून प्रायश्चित करत आहे, अशी पोस्ट पवन कल्याण यांनी एक्सवर टाकली आहे.

हमारी संस्कृति, आस्था, विश्वास और श्रद्धा की धर्मधुरी, श्री तिरुपति बालाजी धाम के प्रसाद में, कुत्सित प्रयासों के तहत, जो अपवित्रता का, संचार करने की कोशिश की गई, उससे मैं व्यक्तिगत स्तर पर, अत्यंत मम हित हूँ, और सच कहूं तो, अंदर से अत्यंत छला गया, महसूस कर रहा हूँ। प्रभुष्ठ

उपमुख्यमंत्री पवन कल्याण आता गुंटूर जिल्ह्यातील नंबूर येथील श्री दशावतार वेंकटेश्वर स्वामी मंदिरात २२ सप्टेंबर पासून ११ दिवसांची प्रायश्चित दीक्षा घेणार आहेत. तिरुपती मंदिरातील लाडूमध्ये जनावरांची चरबी आढळल्यामुळे अतीव दु:ख झाले. मागच्या सरकारच्या काळात ही घटना घडली असली, तरी मला माझीच फसवणूक झाल्याचे वाटते, त्यामुळे मी प्रायश्चित करण्याचा निर्णय घेतला असल्याचे ते म्हणाले.

आपल्या एक्सवरील पोस्टम ध्ये त्यांनी म्हटले, ''आपली संस्कृती, आस्था, विश्वास आणि श्रद्धा यांचा सन्मान करणारी आहे. श्री तिरुपती बालाजी देवस्थानाच्या प्रसादात भेसळ करून जी अपवित्रता पसरविण्याचा प्रयत्न केला गेला, त्याबद्दल मला मनापासून दु:ख वाटतेय. खरे सांगायाचे तर मला माझीच फसवणूक झाली असे वाटतेय. त्यामुळे प्रभू वेंकटेश्वरकडे मी प्रार्थना करतो की, त्याची कृपादृष्टी आमच्यावर आणि सर्व सनातन्यांवर कायम राहू दे.''

पवन कल्याण पुढे म्हणाले, मी या क्षणापासून आता देवासम ोर प्रायश्चित करून माफी मागत आहे. यासाठी मी ११ दिवसांचा उपवास करण्याचा धर्म संकल्प सोडत आहे. उपवासाच्या शेवटच्या दिवशी १ किंवा २ ऑक्टोबर रोजी मी स्वत: तिरुपती बालाजीच्या मंदिरात जाऊन दर्शन घेत आणि देवाची माफी मागणार आहे.

दरम्यान पवन कल्याण यांनी संपूर्ण भारतातील मंदिरांशी संबंधित सर्व समस्यांवर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर 'सनातन धर्म संरक्षण मंडळ' स्थापन करण्याची मागणीही केली आहे. ''सनातन धर्माचा कोणत्याही स्वरूपात होणारा अपमान थांबवण्यासाठी आपण सर्वांनी त्वरित एकत्र आले पाहिजे'', असे आवाहन त्यांनी केले होते.

## शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर टीका करण्याची आपली लायकी नाही, शिंदे गटाच्या नेत्याचं मोठं वक्तव्य

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करु नका, त्यांच्यावर टीका करण्याची आपली लायकी नाही. शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर टीका करण्याएवढा मी मोठा माणूस नसल्याचे वक्तव्य शिंदे गटाचे नेते आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलं. त्यांच्यावर टीका करण्यासाठी एकनाथ शिंदे देवेंद्र फडणवीस असल्याचे गुलाबराव पाटील म्हणाले. माझ्या लेव्हलचा माणूस संजय राऊत असल्याचे गुलाबराव पाटील म्हणाले.

शरद पवारांवर टीका करू नका ती आपली लायकी नसल्याचे वक्तव्य मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. मी शरद पवार उद्धव ठाकरे यांच्यावर कधीच टीका करत नाही. कारण ती माझी लायकी नाही. मी टीका करतो ती संजय राऊत यांच्यावर कारण तो आपल्या लेव्हलचा माणूस असल्याचेही गुलाबराव पाटील म्हणाले.

पान १ वरून...

## विधानसभेसाठी रामदास आठवलेंनी फुंकलं रणशिंग

प्रत्येकाच्या कोट्यातून ४ जागा कशा मिळणार या प्रश्नावर बोलताना, महायुतीत सर्व पक्षांच्या जागांच्या मागण्या आहेत. मी काही अवास्तव म ागणी केलेली नाही. मी १२ जागा मागितल्या आहे. चर्चेत याबद्दल काही कमी जास्त होऊ शकते. या जागा मात्र आम्ही आमच्या चिन्हावर लढवू. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका वेगळ्या चिन्हावर लढल्या तर चालतील, मात्र लोकसभा आणि विधानसभा निवडणूक आम्ही आमच्या चिन्हावर लढवू, असंही आठवले म्हणालेत.

प्रकाश आंबेडकर यांनी अनेक निवडणूक लढून ही त्यांच्या जागा निवडून येत नाही. त्यामुळे मी एकदा म्हणालो होतो, की त्यांनी एनडीएमध्ये यावे, त्यांच्या जागा ही निवडून येतील. त्यांना मंत्री करण्यासाठी मी प्रयत्न करेल. १९९० मध्ये प्रकाश आंबेडकर माझ्यासोबत राहिले असते, तर आमच्या किमान दहा-बारा जागा निवडून आल्या असत्या आणि उपमुख्यमंत्री पद आम्हाला मि ळालं असतं. मात्र, तेव्हा ते आम च्या सोबत आले नाही. प्रकाश आंबेडकर यांनी थोडं सकारात्म क विचार करणे आवश्यक आहे. प्रकाश आंबेडकर यांनी समजून घेतले पाहिजे ते एकटे लढून सत्तेत येऊ नाही, त्यांनी आघाडी करणे आवश्यक आहे, असंही आठवले म्हणालेत.

एकटा असल्याने दलितांना सत्तेत हवा तेवढा वाटा मिळत नाही...

मी आणि प्रकाश आंबेडकर सोबत आलो तर महाराष्ट्राचे राजकारणात बरेच काही घडवू शकते. मी एकटा असल्याने दलितांना सत्तेत हवा तेवढा वाटा मिळत नाही. आम्ही दोघे एकत्रित आलो, तर ते होऊ शकेल. मात्र, त्यासाठी प्रकाश आंबेडकर यांनी सोबत आले पाहिजे. मी काही वंचित बहुजन आघाडीमध्ये जाणार नाही. प्रकाश आंबेडकर यांनी त्यांच्या पक्षाचे नाव बदलायला नको होतं. त्यांनी रिपब्लिकन पक्ष चालवायला हवं होतं. बहुजनांना एकत्रित करण्याच्या त्यांच्या म ताशी मी सहमत आहे.

रामदास आठवले प्रकाश आंबेडकर यांना सोबत येण्याचा दिला प्रस्ताव

रिपब्लिकन पक्षाचा एकत्रीकरण एखाद्या गटाने (खोब्रागडे गटाने) करून होणार नाही. त्यासाठी सर्व पक्षांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रकाश आंबेडकर यांना सोबत आणणे आवश्यक आहे. यापूर्वी प्रकाश आंबेडकर यांच्याशिवाय झालेला एकत्रीकरण समाजाला मान्य झालं नाही. प्रकाश आंबेडकर सोबत आले, तर त्या एकत्रीकरणासाठी मी तयार आहे. मला कुठलंही पद नको प्रकाश आंबेडकर यांना अध्यक्ष केलं तरी चालेल, असं म्हणत रामदास आठवले प्रकाश आंबेडकर यांना सोबत येण्याचा प्रस्ताव दिला आहे. तसेच रिपब्लिकन ऐक्याच्या प्रस्तावासंदर्भातही सकारात्मक भूमिका जाहीर करत प्रकाश आंबेडकर अध्यक्ष झाले तर म ला चालेल अशी भूमिका जाहीर केली आहे.प्रकाश आंबेडकर यांच्याशिवाय रिपब्लिकन ऐक्य शक्य होणार नाही हेही आठवले म्हणाले.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नागपुरात पत्रकार परिषद घेतली. मला तीन वेळेला मोदी सरकार मध्ये मंत्रीपद मिळाले, कार्यकर्त्यांमुळे हे झाले. मला रिपब्लिकन पँथरच्या काळापासून नागपूर आणि विदर्भाने भक्कम साथ दिली. सध्या ज्या सरकारम ध्ये आहे, ते पाच वर्ष चालणारे सरकार असून पूर्ण बहुमत आहे. नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू आमच्या सोबत असून पुढे ही सोबत राहतील. पूर्वी ही असे सरकार चालले आहे, असा विश्वास यावेळी रामदास आठवले यांनी केला आहे.

## बाप्पा पावला! सोने-चांदीच्या लिलावातून लालबाग राजाच्या मंडळाला मिळाले तब्बल 'इतके' कोटी

**मुंबई/प्रतिनिधी :** गणेशोत्सवात भाविकांनी लालबागच्या राजाला कोट्यावधी रुपयांचे सोने-चांदी अर्पण केले. या दागिन्यांचा लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून शनिवारी लिलाव करण्यात आला. लिलावाच्या पहिल्याच दिवशी २ कोटी ३५ लाख १८ हजार रुपयांच्या सोने-चांदीच्या दागिन्यांची आणि वस्तूंची विक्री झाली आहे.एका भाविकाने लिलावात १ किलो सोन्याची वीटदेखील ७५ लाख ९० हजार रुपयांना खरेदी केली. तर सोने-चांदीच्या वेगवेगळ्या वस्तू गणेश भाविकांनी खरेदी केल्याची माहिती लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब कांबळे यांनी दिली आहे.

# दिग्रस येथे जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धा संपन्न

## उत्कृष्ट आयोजनाबद्दल सहभागी खेळाडू, शिक्षकांनी दिली दाद!

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी



**दिग्रस :** येथील गुरुकुल इंग्लिश मिडीयम सीबीएससी स्कूलच्या प्रशस्त मैदानावर जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धा अतिशय आनंद आणि उत्साहात पार पडल्या. जिल्ह्यातील मुला मुलींच्या ६६ संघानी यात सहभाग घेतला. आयोजकांनी केलेल्या व्यवस्थेबाबत खुल्या मनाने दाद देत खेळाडू आणि शिक्षकांनी पुढील जिल्हा आणि विभागस्तर स्पर्धा येथेच घेण्याचा आग्रह क्रीडा विभागाकडे धरला आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ व तालुका क्रीडा संयोजक दिग्रस यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धा दिनांक १८ ते २० स्पटेंबर दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धे च्या उद्घाटनीय समारंभाच्या अध्यक्षस्थानी गट शिक्षण अधिकारी मुकेश कोंडावार, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विराट भास्करवार, गुरुकुल इंग्लिश शाळेच्या प्राचार्य शेख आबेदा बगेम, उपप्राचार्य शरीफ शेख, कबड्डीतील काला तुफान आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू प्यारेलाल पवार, डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम फोरमचे अध्यक्ष फिरोज खान, नवरंग व भारत मेडिकल स्टोअर्सचे संचालक आमीन नौरंगाबादे, अक्रम पुजानी, उपस्थित होते.

दिग्रस तालुका शारिरीक शिक्षण शिक्षक संघटनेचे शेख फैजान, जयवंत सास्तीकर, अविनाश गलाट, गजानन इंगळे, आनंद शर्मा, शिल्पा पाटील, विक्रम राठोड, प्रशांत बावणेर, दत्ता घुकसे, भाऊ मनवर, सादीक गारवे, अजीम शेख, फारुख चव्हाण, सोनु शेख, विजय कांबळे, समीर दादुवाले, सुरज पवार, सुबोध चिंतावार, शोएब शेख, आशिष अगलदरे, नितीन डहाके, प्रदीप खेकाळे, एकनाथ डोगरे, विजय आडऊ, मोसीन शेख, वैभव पारधी, असीफोद्दीन क़ाज़ी तसेच दिग्रस तालुका शारिरीक शिक्षण शिक्षक संघटनेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### स्पर्धेचे अप्रतिम आयोजन

दिग्रस येथे झालेल्या खो-खो स्पर्धा आयोजनात स्थानिक क्रीडा शिक्षकांनी चांगले आयोजन केल्याच्या सुखद प्रतिक्रिया सहभागी खेळाडू आणि क्रीडा शिक्षकांनी व्यक्त केल्या. पिण्याचे पाणी, केळी आणि इतर सर्व व्यवस्था मैदानावर चोख होत्या. भरपूर लाल मातीचे मैदान, तटस्थ पंच, विजयी चषक, मैदानावरील सर्व सुविधा उत्तम असल्याने स्पर्धा यशस्वी झाल्याचे मत सहभागी खेळाडूंनी व्यक्त केले. पुढे होणाऱ्या विभाग स्तरीय आणि जिल्हास्तरीय स्पर्धाही येथेच व्हाव्यात असे मत शिक्षकांनी दिलेल्या लेखी अभिप्रायातून व्यक्त केले.